## (३): तामिळनाडू राज्य :

तामीलनाडू पूर्व किना-यावर पसरलेले राज्य आहे. राज्यात एकूण २६ जिल्हे आहेत. संपूर्ण राज्यात ऐतिहासिक, औद्योगिक आणि थंड हवेची पर्यटन स्थळे आहेत. पैकी (१) उटकमंडी (निलगीरी जिल्हा) (२) कोडाई कॅनॉल (मदुराई जिल्हा) (३) येरकाड ( सेलम जिल्हा) प्राचीन काळी जैन धर्माचा प्रचार तामिळनाडूत मोठ्या प्रमाणात होता. त्याचे प्रतिक म्हणून संपूर्ण राज्यात अनेक जिनमूर्त्या असून अनेक भव्य जिनमंदिरे आहेत. वर्तमान काळात मंदिर निर्मिती कमी आहे.

### चेन्नई - ( मद्रास)

मार्ग: भारताच्या सर्व भागातून सडक मार्गे, रेल्वे मार्गे, आणि विमान मार्गे चेन्नईला जाता येते. या ठिकाणी अनेक दिंगबर- श्वेताबंर जिन मंदिरे आहेत. पैकी दि. जैन खन्डेलवाल धर्मशाळा आणि मंदिर, मिंट स्ट्रीट कुडलीयार रोड ११ येथे आहे. मिंट स्ट्रीट वर सुराणा जैन धर्मशाळा आणि ३ श्वेतांबर जैन मंदिरे अति भव्य आहेत.

प्रेक्षणीय स्थळ-- चेन्नईचा समुद्र किनारा खूप मोठा आहे. मरिनबीच, गांधी मंडप, अन्ना मत्स्यालय, कामराज मेमोरियल, सर्पबाग आदि दर्शनीय स्थळे आहेत.

### कांचीपुरम

मार्ग: चेन्नईपासून ७० कि.मी सडक आणि रेल्वेमार्गे, दक्षिण भारतातील पल्लव- वंशीय राजाची राजधानी होती. हे ऐतिहासिक क्षेत्र आहे. या ठिकाणी ८५ जिन मंदिरे असण्याचा उल्लेख आढळतो. शहराच्या ४ भागामध्ये विस्तारीत. जिनकंची अशी निराळी वस्ती आहे. या ठिकाणचे भ. चंद्रप्रभू जिनालय, विशाल परंतु खंडित अवस्थेत आहे. जैनेतरांनी सर्व जिन मंदिरे उदध्वस्त करू न टाकली व त्या ठिकाणी न्यु हिन्दु मंदिरे बांधलेले आहेत. एका बंदिस्त आवारांत महावीर मंदिर आणि पार्श्वनाथ भगवानाची विशाल मूर्ती आहे. मंदिराच्या पाठीमागे एक मोठा वृक्ष आहे.

त्या ठिकाणी आचार्य मल्लीसेन, आचार्य पुष्पसेन ध्यान, अध्यधन करीत असत. मेरू - मंदिर, पद्मपुराण तामीळ भाषेत प्रसिध्द आहे. नवनिर्मित- महावीर जिनालय असून कला- कुसरीसाठी प्रसिध्द आहे. चिनी यात्री, फ़ायीयान यांनी आपल्या प्रवास वर्णनात ह्या ठिकाणी ८५ जिन मंदिरे असल्याचा उल्लेख केला आहे.

## अतिशयक्षेत्र - तिरू नरम कोंड्रम

मार्ग: चेन्नईवरू न त्रिचनापल्ली मार्गे पिल्लेग्राम कुपाम गावापासून ५ कि.मी. अंतरावर क्षेत्र आहे. येथील पहाडावर एका विशाल गुफ़ांमध्ये जिनालय आहे. भ.चंद्रप्रभूंचे मंदिर असून मंदिराच्या शिखराच्या बाजूला भ. पार्श्वनाथ तीर्थंकरांची ५ फूट उंच खडगासन प्रतिमा आहे. या गुफ़ेंपासून यक्ष- याक्षिणी यांच्या कलाकृती असून भ. पार्श्वनाथ तीर्थंकरांची मूर्ती गुहेमध्ये कोरलेली आहे. अनेक जैन- जैनतर आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी दर्शनास येत असतात. मंदिराच्या शिखराच्या चारही बाजूंनी जिनबिंब कोरलेले आहेत.

सुविधा: पहाडाच्या पायथ्याशी प्राचीन धर्मशाळा उपलब्ध आहे.

## अतिशयक्षेत्र- अरपाकम

मार्ग: कांचीपुरमवरू न १४ कि.मी बसमार्गावर हे क्षेत्र आहे. या ठिकाणी भ. आदिनाथ स्वामीचे मंदिर असून जैन- अजैन या ठिकाणी भक्तीभावाने पूजा करतात. हे मंदिर जवळजवळ दोन हजार वर्षाचे प्राचीन असून तामिळनाडू ग्रंथ तिरूकलपाकमची रचना या ठिकाणीच झाली. तेथील हवामान उत्तम असल्याने भक्तजन आदिनाथ तीर्थंकरांच्या दर्शनासाठी येत असतात.

सुविधा: मंदिराच्या बाजूला धर्मशाळा उपलब्ध आहे.

## अतिशयक्षेत्र - येलंगाडू

मार्ग: हे क्षेत्र बंदीवासी विभागात आहे. येथील मूलनायक भगवान आदीनाथाची मूर्ती असून भ. नेमिनाथाची मनोज्ञ मूर्ती आहे. मूर्तीचा रंग सुवर्णमय असून मूर्तीचे प्रभामंडल सात फ़द्‌नट उंच, चार फूट रूंद असे चकचकीत आहे. तेथे जिनालय आहे.

## अतिशयक्षेत्र - मेलसिटमुर

मार्ग: हे क्शेत्र त्रिवेंद्रम पासून २० कि.मी. स्थित आहे. या ठिकाणी दोन विशाल जिनालये असून त्याची शिखरे सात मजली आहेत. भ. नेमिनाथाची मनोज्ञ मूर्ती आहे. या संस्थानात एका खोलीमध्ये हजारो वर्षे प्राचीन रौप्य स्फ़टीक , पन्ने, हिरे व धातुच्या जैन मूर्त्या असून येथील ग्रंथ अत्यंत प्राचीन आहेत. प्रतिवर्षी महावीर जंयतीस उत्सव असतो.

## अतिशयक्षेत्र - नगरम नेत्तपाकम

मार्ग: उत्तर ऑरकॉड जिल्ह्यामध्ये मेलापंदल गावापासून १ कि.मी अंतरावर हे क्षेत्र आहे. ह्या ठिकाणी एक विशाल जिन मंदिर असून त्याची परिक्रमा भिंत १२ फूट उंच व १५ फूट रूंद अशी असून मूलनायक भ. मल्लीनाथांची मूर्ती आहे. हे स्थान जीवंधर स्वामीचे जन्मस्थान मानले जाते. या ठिकाणी लव-कुश यांनी पूजा केली होती. हे मंदिर तीर्थंकर मुनीसुव्रतनाथ यांच्या काळातील असावे असे मानले जाते.

## मदुराई

मार्ग: तामिळनाडू राज्यातील हे दोन नंबरचे औद्योगिक आणि ऐतिहासिक शहर आहे. या ठिकाणी सडक आणि रेल्वे मार्गे जाता येते. मदुराई हे धार्मिक आणि पर्यटन स्थळ आहे. या

ठिकाणचे मिनाक्षी मंदिर विशाल व पुरातन असून दर्शनीय आहे. धर्मदेवी कुश्मांडिनी मातेश्वरीच्या नावाने मंदिर प्रसिध्द होते. भ. नेमिनाथाची विशाल मूर्ती व अन्य तीर्थंकराच्या मूर्त्या त्या ठिकाणी होत्या. परंतु कालांतराने मिनाक्षी मंदिरामध्ये रू पांतर झाले. मंदिरात एक्ंदरीत १०८ विशाळ गोलाकार स्तंभ आहेत. स्तंभावर जैनत्वाच्या खुणा आहेत. या क्षेत्राचा संबध, आचार्य अरिष्टनेमी, माघनंदी, गुणसेन, कनकनंदी आदि आचार्याशी जोडला जातो.

सुविधा: मदुराई रेल्वे स्टेशन स्मोर एक महाराष्ट्रीय बांगर धर्मशाळा आहे.

## रामेश्वरम

मार्ग: मदुराईवरू न सडक व रेल्वे मार्गे ११८ कि.मी स्थित हे क्षेत्र आहे. हिंदुच्या १२ ज्योर्तिलिंगापैकी रामेश्वर हे क्षेत्र आहे. रामनाथ स्वामी मंदिर अत्यंत विशाल असून हजारो भव्य कोरीव खांबानी व विशाल आवारांनी युक्त आहे. मंदिरात महादेवाची पिंड श्रीरामाने स्थापित केलेलीन आहे. पूर्व- पश्चिम, दक्षिण-उत्तर, परिक्रमा ४०० फुट लांब आहे. अद्वितीय कलापूर्ण असे मंदिर असून या ठिकाणी मंदिर परिसरात २४ जलतीर्थ आहेत. भाविक लोक प्रत्येक तीर्थांमध्ये अंघोळ करतात. पुनर्निमीत भव्य असे समुद्रावर पूल बांधला आहे.

प्रेक्षणीय स्थळे: लक्ष्मणतीर्थ, गंधमार्धन पर्वत, विश्वनाथ मंदिर, विशालाक्षी मंदिर, सेतुसंनिधी आदी दर्शनीय स्थळे आहेत.

सुविधा: अनेक धर्मशाळा सर्व सुविधांनी युक्त उपलब्ध आहेत.

## अतिशयक्षेत्र - पेरू मंडूर

मार्ग: हे क्षेत्र टिंवडिवनम विभागात टिंडिवनम पासून २० कि.मी दूर आहे. या ठिकाणी दोन भव्य जिनालय आहेत. (१) आदिश्वर कोईल (२) चंद्रप्रभू कोईल. या मंदिरात हजारो जैन प्रतिमा आहेत.

आख्यायिका: समुद्राजवळील मैलापूर गाव समुद्रात जाईल असे एका श्रावकाच्या स्वप्नात आल्याने तेथील सर्व प्रतिमा या ठिकाणी आणण्यात आल्या. त्यानंतर मैलापूर गाव समुद्रात बुडाले. या ठिकाणी जैन शिक्षापीठ आहे. ताडपत्रावर लिहलेले हजारो ग्रंथ संग्रहीत आहेत. मंदिरासमोर एक विशाल मानस्तंभ व ध्वज आहे.

सुविधा: जैन धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - नागरकोईल

मार्ग: कन्याकुमारीजवळील हे जिल्ह्याचे गाव आहे. रेल्वे व सडक मार्गे जाता येते. २५ फ़द्नट अशा भव्य पहाडावर भगवान वृषभनाथांची सातिशय प्रतिमा आहे. मंदिराच्या पिछाडीस भगवान बाहुबली स्वामींची मूर्ती पहाडावर कोरलेली आहे. पहाडाच्या तळाशी एक गोल भ्व्य दगडावर भगवान महावीर, आदिनाथ, पार्श्वनाथ, चंद्रप्रभू यांच्या पद्मासन प्रतिमा कोरलेल्या आहेत. नगरकोईल येथे नागराज स्वामीचे मंदिर अत्यंत भव्य व दर्शनीय आहे.

## कन्याकुमारी

मार्ग- सोलापूराहून मुंबई- कन्याकुमारी रेल्वेने जाता येते. जवळ जवळ १६०० कि.मी अंतरावर आहे. कन्याकुमारी अतिशय रमणीय असे स्थळ असून भारताचे दक्षिणकडील सर्वात शेवटचे टोक आहे. हिंदी महासागर, बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्र यांचा एकत्र संगम असून ते दृश्य विलोभनीय असे आहे.

प्रेक्षणीय  स्थळ -  (१) गांधी मंडपम  (२) कन्याकुमारी  मंदिर  (३) स्वामी विवेकानंद स्मारक (४) दिपस्तंभ.

सुविधा:  विवेकानंदपुरम येथे उत्तम धर्मशाळा सर्व सोयीनी युक्त असून भोजन व्यवस्था अल्पदरात उपलब्ध आहे.

आरक्षण पत्ता:  मॅनेजर, विवेकानंदपुरम कन्याकुमारी, ( तामिळनाडू राज्य)

## महाबलीपुरम

मार्ग:  चेन्नअईपासून ईस्ट कोस्ट हायवेवर ६० कि.मी अंतरावर आहे.महाबलीपूरम हे एक ऐतिहासिक पर्यटक स्थळ असून भव्य समुद्रकिनारा आहे.

प्रेक्षणीय स्थळ:  (१) पंचरथ (२) सी. टेम्पल (३) पांडव कलाकृती  (४)  दिपस्तंभ  (५) मगरपालन केंद्र

सुविधा:  या ठिकाणी अनेक लॉज असून तामिलनाडू पर्यटन विभागाचे हॉटेल्स आहेत.

## पॉडेचरी

मार्ग:  चेन्नईवरू न १५० कि.मी दक्षिणेकडील केंद्रशासित राज्य आहे. पूर्वीच्या फ्रेंच राजवटीच्या खुणा, वास्तु आजही सुस्थितीत आहेत. आध्यात्मिक गुरू  पूज्य अरविंद्य घोष यांनी स्थापन केलेले भव्य असे अरविंद आश्रम असून अरविंद आणि मॉ यांच्या समाध्या आश्रमात आहेत.

प्रेक्षणीय स्थळे:  राजभवन, विधानसभा, भव्य समुद्रकिनारा, गणेश टेंपल, बॉटनिकल गार्ड्न, प्रशस्त रस्ते आणि भव्य मार्केट पाहण्यासारखे आहे.

सुविधा: अरविंद आश्रममध्ये अल्पदरात राहण्याची व भोजनाची सुविधा आहे. शिवाय अनेक छोटे मोठे हॉटेल्स आहेत.